# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई पोलीस ठाणे ACB पहिली खबर क्र. 26 वर्ष 2025 दिनांक 22/08/25
   State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम १९८८ सुधारित २०१८, कलमे Sections ७ प्रमाणे
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार ..., तारीख पासून 8/8/25 वेळ ..., तारीख पर्यंत 22/8/25 वेळ ...
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याचा तारीख ... वेळ ...
   Information received at P.S. Date Time
   (c) गुन्हा दाखल झाल्याचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ..., तारीख 22/08/2025 वेळ 03.20
   General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ...

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ...
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ..., ठिकाणाचे नंबर ..., गल्ली ..., रस्त्याचे नाव ...
   Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..., गाव ..., पोस्ट ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
   Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
   (c) पोलीस ठाण्याचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
   In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address
   (a) नाव Name [illegible] वर्मा (b) वडीलांचे / पतीचे नाव चंद्रशेखर वर्मा
   Father's /Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय ३८ वर्ष (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ...
   Date of Birth & Age Nationality Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक ... दिल्याचा दिनांक ... दिल्याचे ठिकाण ... (f) व्यवसाय ...
   Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ..., जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता : 1/23 गल्ली / वार्ड नं. मोरेश्वर चाळ घर / नाव नंबर ... फोन /मो. नंबर ... पॅन नं. ... वोटर्स नं. ...
   Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
   रस्त्याचे नाव ... जवळचे प्रसिद्ध ठिकाण सप्तश्रृंगी माता मंदिर जवळ गाव ... पोस्ट टागोर नगर नं. ५ पो. स्टे. ...
   Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
   तालुका विक्रोळी जिल्हा मुंबई ८३ राज्य ... सध्याचा पत्ता ...
   Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. मा. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभिलेखा यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   आरोपी - श्री नितीन [illegible] वय ४० वर्ष धंदा नोकरी
   एम.एम.आर.डी.ए. [illegible] बांद्रा पूर्व मुंबई

COMMISSIONER OF POLICE ... BUREAU MUMBAI

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता आलेल्या विलंबाची कारणे [illegible]
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मुल्य
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any —

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

सालील फि. यांचे मित्र श्री ज्ञानेंद्र सोलंकी यांना बृ.म.प्र.वि.प्रा. कार्यालयातून पुनर्वसन प्रकल्पात [illegible] कांजूर मार्ग (पु) मुंबई येथे सदनिका वितरीत झाली आहे. सदर सदनिकेची ताबा पावती व चावी मिळणे करीता सोलंकी यांचे वतीने फि. हे M.M.R.D.A. कार्यालयात पाठपुरावा करीत असताना [illegible] यांनी फि. यांचेकडे [illegible] म्हणून स्वतःच्या फायद्याकरीता रु. ४०,०००/- रकमेची मागणी करून त्यापैकी रु. ३०,०००/- स्वीकारली म्हणून गुन्हा

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........
District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name [illegible]
दर्जा Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. नं./ब. नं.
Posting
Code No. of I.O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख —
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

वरील फिर्याद मोठ्याने फिर्यादि स्वतंत्र पंचावर नेदविण्यात आलेला असुन ती लोकांना ऐकण्यात आलेली आहे तिच्य गुन्ह्यांची वहेली खबर म्हणुन समजण्यात यावी

समक्ष

(जगदिश वळवी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

फिर्याद दिनांक ११/०४/२०१९

माझे नाव शैलेश चंद्रशेखर वर्मा, वय ३८ वर्षे, धंदा– व्यवसाय (एस व्हि अॅड व मार्केटिंग व वर्मा अॅन्ड असो. कन्सल्टींग) रा.ठि. – जोशी चाळ नं. ०१, रुम नं. २३, देवी संतोषीमाता सेवा संस्था मंदिराच्या बाजुला, टागोर नगर नं. ५, विक्रोळी (पुर्व), मुंबई ४०० ०८३. मोबाईल नं. ८६९२८९४६८२/८१६९२८४२२३ असे आहे. मी समक्ष फिर्याद देतो की,

मी वरील प्रमाणे असुन वर दिलेल्या पत्यावर गेली १० वर्षापासून माझ्या कुटुंबासह राहतो. माझा एस व्हि अॅडव्हर्टायझिंग व मार्केटिंग तसेच वर्मा अॅन्ड असो. कन्सल्टींग अशा ०२ खाजगी व्यवसाय असून त्यांचा मी प्रोप्रायटर आहे. मी देवी संतोषीमाता सेवा संस्था, टागोर नगर नं. ५, विक्रोळी पुर्व, मुंबईचा अध्यक्ष असून या संस्थेत इतर ०७ सहकारी सभासद आहेत. सदर संस्थेमार्फत गरजु लोकांची शासकीय कार्यालयातील प्रलंबित कामे पुर्ण करण्यासाठी मदत करणे व इतर सामाजिक कामे केली जातात. सदर संस्था ही धर्मादाय आयुक्त, वरळी येथे नोंदणीकृत आहे. संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या कामांकरीता लोकांकडुन, लागणाऱ्या खर्चा व्यतिरिक्त इतर कोणतेही शुल्क घेतले जात नाही.

साधारण जानेवारी २०१९ मध्ये कर्वे नगर, कांजुरमार्ग (पुर्व) येथे राहणारे माझे मित्र श्री जालिंदर चंद्रकांत मोकाशी हे आमच्या वर नमुद संस्थेच्या कार्यालयात आले. श्री जालिंदर मोकाशी यांची राहत असलेली कर्वे नगर कांजुरमार्ग (पुर्व) येथील खोली एमएमआरडीने एमयुटीपीच्या शासकीय प्रकल्पाअंतर्गत दि. ०९/०४/२०१५ रोजी निष्कासित केलेली होती. सदर निष्कासित खोलीबाबत त्यांना एमयुटीपी (होस्ट कम्युनिटी) अंतर्गत कर्वे नगर, कांजुरमार्ग (पुर्व), मुंबई येथे एमएमआरडीएने बांधलेल्या इमारतीपैकी इमारत क्र. पी–२, रुम नं. ६१२ ही २६९ चौ.फुटाची रुम वाटप करण्यात येत असल्याबाबतचे एमएमआरडीएचे वाटप पत्र क्र. एमयुटीपी/एसडीसी/सीडीओ/२०१८, दि. ०४/१०/२०१८ अन्वये देण्यात आले होते. परंतु सदर रुमची ताबा पावती व चावी पाठ पुरावा करुनही न मिळाल्याने त्याने सदर काम आमच्या संस्थेकडुन पुर्ण करुन देण्याबाबत मला विनंती केली व त्याप्रमाणे सदरचे कामाकरीता आमच्या संस्थेच्या नावे माझ्या नावाने अधिकार पत्र दिले. मी त्यांना संबंधितकामाकरीता श्री अनिल वानखेडे, महानगर उप आयुक्त, भुमी व मिळकत शाखा, मु.म.प्र.वि.प्राधिकरण, बांद्रा (पुर्व), मुंबई यांचे नावे लेखी अर्ज करण्यास सांगितले त्याप्रमाणे त्यांनी दि. ०५/०२/२०१९ रोजी सदरचा लेखी अर्ज तयार करुन तो वर नमुद कार्यालयात दिला.

मी सदरच्या कामाचा पाठपुरावा करीत असताना, नमूद अर्ज हा त्या कार्यालयातील लोकसेवक श्री नितीन कदम, यांचेकडे पुढील कार्यवाहीकरीता वर्ग झाल्याचे मला समजले. संस्थेच्या कामा निमित्त माझे वर नमुद कार्यालयात जाणे येणे असल्याने मी श्री नितीन कदम यांना ओळखत होतो त्यामुळे त्यांचा मोबाईल क्रमांक माझ्याकडे होता म्हणुन मी श्री नितीन कदम यांचा मोबाईल क्रमांक ९९८७२६४७३० वर माझ्या मोबाईल क्रमांक ८१६९२८४२२३ व ८६९२८९४६८२ वरुन दिनांक ०५/०२/२०१९, ११/०२/२०१९, २६/०२/२०१९ व दि. २७/०२/२०१९ रोजी असे चार वेळा संपर्क केला. दि. २७/०२/२०१९ रोजी मी त्यांचेशी केलेल्या संपर्कामध्ये श्री नितीन कदम यांनी ते कर्वे नगर येथे येणार असून त्यावेळी माझ्याशी फोनवर संपर्क करतील व तेव्हा मला त्यांची भेट घेण्याबाबत सांगितले. त्या प्रमाणे श्री नितीन कदम यांनी दि. २७/०२/२०१९ रोजी माझ्या मोबाईलवर साधारण ११.०० वा. च्या दरम्यान संपर्क करुन कर्वे नगर येथील पी–२ इमारती जवळ येण्यास सांगितले, त्याप्रमाणे मी त्यांना भेटलो. मी त्यांना श्री जालिंदर मोकाशी यांचे कामाबाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी रुम ताबा पावती देण्यासाठी कमीत कमी रु. ४०,०००/– लाच म्हणुन द्यावे लागतील असे मला सांगितले. त्यावर मी ऐवढे पैसे द्यायला जमणार नाही परंतु मी प्रयत्न करीन असे सांगितले असता, श्री नितीन कदम यांनी सद्या ते मार्च महिन्यात आर्थिक वर्षाच्या कामात व्यस्त असल्याने, मला रु. ४०,०००/–

इतक्या रक्कमेचे व्यवस्था करुन एप्रिल मध्ये फोन करण्यास सांगितले. त्यानुसार मी दि. ०३/०४/२०१९ रोजी श्री कदम यांचे वर नमुद मोबाईल वर संपर्क केला असता त्यांनी मला दि. ०८/०४/२०१९ रोजी लाचेची ठरलेली रक्कम घेऊन त्यांचे कार्यालयात भेटण्याकरीता बोलावले.

श्री जालिंदर यांनी त्यांना वाटप झालेल्या रुमची ताबा पावती व चावी संबंधित कार्यालयाकडुन मिळवुन देण्याकरीता लोकसेवक श्री नितीन कदम यांना लाच द्यायची माझी इच्छा नव्हती म्हणुन, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक ०८/०४/२०१९ रोजी लेखी तक्रार दिली. माझ्या लेखी तक्रारीवरुन पोनि वळवी यांनी दोन शासकीय पंचाना बोलावून लोकसेवक श्री नितीन कदम यांनी माझ्याकडे लाच मागीतली आहे किंवा कसे? याबाबत पंचासमक्ष पडताळणी केली असता, श्री. नितीन कदम यांनी माझ्याकडे श्री जालिंदर चंद्रकांत मोकाशी यांना वाटप झालेल्या रुमचा ताबा पावती देण्याकरीता रु ४०,०००/– लाच मागीतली असल्याचे निष्पन्न झाले. सदरवेळी लोकसेवक श्री नितीन कदम यांनी रुम ताबा पावतीकरीता श्री जालिंदर मोकाशी यांची आवश्यक ती कागदपत्रे दि. ०९/०४/२०१९ रोजी कार्यालयात त्यांचेकडे आणुन देण्यास सांगितले. त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

लोकसेवक श्री नितीन कदम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी श्री जालिंदर मोकाशी यांचेकडुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती घेऊन दि. ०९/०४/२०१९ रोजी एमएमआरडीए कार्यालयात श्री नितीन कदम यांचेकडे नेऊन दिल्या. त्यावेळी श्री नितीन कदम यांनी मला पैसे देण्यासाठी कधी भेटायचे हे संध्याकाळी फोन करुन सांगतो असे सांगितले परंतु त्यांनी फोन न केल्यामुळे मी माझ्या मोबाईल वरुन श्री नितीन कदम यांना ४ ते ५ वेळा संपर्क करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांचा फोन लागला तेव्हा श्री नितीन कदम यांनी मला दि. ११/०४/२०१९ रोजी दुपारी १२०० वा पर्यंत पैसे घेऊन कार्यालयात येण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी सदरची बाब पोनि वळवी यांना त्यांचे मोबाईल वर कळविली असता पोनि वळवी यांनी दि. ११/०४/२०१९ रोजी मला लाप्रवि कार्यालयात येण्याच्या सुचना दिल्या व त्यानुसार सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येईल असे मला सांगितले.

दिनांक ११/०४/२०१९ रोजी मी सुमारे १२.१५ वा. लाप्रवि कार्यालयात हजर झालो व लोकसेवक श्री नितीन कदम यांनी मागीतलेली रक्कम रु ४०,०००/– माझ्याकडे नसल्याने मी माझ्याकडे असलेले रक्कम रु १०,०००/– घेवून आलेबाबत पोनि वळवी यांना सांगितले. त्यानंतर पंचाच्या समक्ष पोनि वळवी यांनी मला पुढे करण्यात येणा–या सापळा कारवाईच्या अनुषंगाने सविस्तर माहिती दिली. माझी अंगझडती घेवून, मी हजर केलेल्या लाचेच्या नोटांच्या छायांकित प्रत काढुन नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावणे, अॅन्थ्रासिन पावडरचे उपयोग, गुणधर्म, प्रात्यक्षीक दाखविणे, लाचेच्या नोटा माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवणे, लाच स्विकृती नंतर इशारा करणे याबाबत पंचासमक्ष कारवाई करुन त्याबाबतचा सापळा पुर्व पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर पोनि वळवी, सपोआ वाव्हळ तसेच सापळा पथक असे लाप्रवि कार्यालयातून दोन पंचासह दोन गाडयांमधून निघून वरळी सी–लिंक मार्गाने वांद्रा–कुर्ला कॉम्पलेक्स येथे एमएमआरडीए ऑफीस जवळ पोहचलो तेथे पोनि वळवी यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तो माझ्या शर्टाच्या डाव्या खिशात ठेवला व मी पंच मेश्राम यांचेसह एमएमआरडीए कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. मी महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (मुं.म.प्र.वि.प्रा) मुंबई, यांचे कार्यालयास जाण्यापुर्वी लोकसेवक कदम यांना फोन केला असता त्यांनी ते एमएमआरडीए कार्यालयाच्या सातव्या मजल्यावर असल्याचे सांगितले तेव्हा मी त्यांना पाचव्या मजल्यावरील त्यांचे कार्यालयात येतो असे सांगितले त्याप्रमाणे मी पंचासह पाचव्या मजल्यावर गेलो व लोकसेवक कदम यांना पुन्हा फोन केला व मी त्यांचे कार्यालयात आल्याबाबत सांगितले, तेव्हा त्यांनी मला मी पाच मिनटांत येतो तुम्ही तेथेच थांबा असे सांगितले. साधारण पाच ते सात मिनटांनी लोकसेवक हे पाचव्या मजल्यावर त्यांचे कार्यालयात आले. तेव्हा मी

त्यांना कामाबाबत विचारले असता त्यांनी लाचेच्या रक्कमेबाबत माझ्याकडे विचारणा केली. त्यावर मी त्यांना पैसे आणल्याचे सांगितले असता श्री कदम यांनी मला त्यांचे बरोबर कार्यालयातून बाहेर नेऊन आपणबाहेर जाऊ असे मला सांगितले. त्यावर मी त्यांना बाहेर नको येथेच देतो असे सांगितल्यावर कदम यांनी मला जिन्याने पहिल्या मजल्यापर्यंत नेले. सदरवेळी आम्ही पहिल्या व दुसऱ्या मजल्याच्या मध्यावर असताना लोकसेवक कदम यांनी माझ्याकडे लाचेची रक्कम मागितली तेव्हा मी माझ्या उजव्या हाताने माझे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यातुन लाच रक्कम रूपये १०,०००/— काढुन नितीन कदम यांचे समोर धरली. तेव्हा नितीन कदम यांनी त्यांचे उजव्या हातानी माझ्या हातातील लाच रक्कम रूपये १०,०००/— घेतली व त्यांच्या नेसनीस असलेल्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यात ठेवली. लोकसेवक यांनी लाच स्विकारल्यानंतर मी मला नेमुन दिलेला पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी माझ्या आजुबाजुला असलेले सापळा पथक व पंच तेथे हजर झाले व त्यांनी नितीन कदम यांचे दोन्ही हात पकडले व पोनि वळवी यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला व मला बाजुला थांबण्यास सांगितले.

पोनि वळवी यांनी श्री नितीन कदम यांना स्वतःची ओळख करुन दिली व लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता नितीन कदम यांनी लाचेची रक्कम त्यांचे खिश्यात ठेवली असल्याचे सांगितले पोनि वळवी यांचे सुचनेप्रमाणे पंच श्री मेश्राम यांना श्री नितीन कदम पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यातील लाचेची रक्कम काढुन ती स्वतःचे ताब्यात घेतली. त्यानंतर पोनि वळवी यांचे सुचनेप्रमाणे आम्ही सर्व सापळा पथक पंच व लोकसेवक यांचे सह पाचव्या मजल्यावरील लोकसेवक यांचे कार्यालयात गेलो तेथे पोनि वळवी यांनी मला एका खोलीत नेले व तेथे कृत्रीम अंधार करून माझ्या हातांची, कपडयांची अल्ट्राव्हॉयलेट दिव्याखाली तपासणी केली तेंव्हा माझे उजव्या हातावर फिक्कट हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली व पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्याच्या तोंडास व आतील बाजुस फिक्कट हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पंचांनी माझी अंगझडती घेऊन माझ्या सामानाची दिव्याखाली तपासणी करून माझे सामान परत दिले. त्यानंतर पोनि वळवी हे मला पथकासह लाप्रवि कार्यालय, वरळी, मुंबई येथे घेवून आले. लाप्रवि कार्यालय, वरळी, मुंबई येथे आल्यानंतर पोनि वळवी यांनी मला पंचासमक्ष विचारणा केल्यावरुन मी, नितीन कदम यांना लाच रक्कम देण्यासाठी रवाना केले पासुन नितीन कदम यांनी लाच रक्कम स्विकारल्या नंतर मी इशारा करेपर्यंत घडलेली हकिकत सांगावी. त्यावर मी वरिलप्रमाणे हकिकत सांगितली.

एकंदरीत दिनांक ०८/०४/२०१९ रोजी नितीन कदम हे माझ्याकडे श्री. जालिंदर मोकाशी यांना एमएमआरडीए कडुन वाटप झालेल्या खोलीचा ताबा देण्याकरीता लाच म्हणुन रक्कम रु ४०,०००/— मागत असल्याच्या मी दिलेल्या लेखी तक्रारीवरून पोनि वळवी यांनी पंचासमक्ष दिनांक ०८/०४/२०१९ रोजी लाच पडताळणी केली व आज दिनांक ११/०४/२०१९ रोजी नितीन कदम यांनी माझेकडून रु. १०,०००/— रक्कम लाच म्हणुन स्वीकारली असता, सापळा पथकाने नितीन कदम यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले आहे. म्हणून श्री. नितीन सदानंद कदम, वय ४० वर्षे, सहाय्यक भुमि व मिळकत व्यवस्थापक, महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (मु.म.प्र.वि.प्रा) मुंबई. यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी माझी तक्रार देत आहे.

समक्ष,

(जगदिश वळवी )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

INSPECTOR OF POLICE
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU